रयत शिक्षण संस्था, सातारा




रयत शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा

२०२६

प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक

भाग १

संस्थापक



पद्मभूषण
डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील
डी.लिट.

रयत माउली



त्यागमूर्ती
सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील

अध्यक्ष



पद्मविभूषण
मा.खा.शरदचंद्रजी गोविंदराव पवार
डि.लिट.

रयत शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा २०२६-२७

शाखेचे नाव : S.S.G.M. College, Kopargaon.

मनोगत



श्री. चंद्रकांत दळवी IAS (Retd.)
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा

शिक्षण ही समाजाच्या सर्वांगीण विकासाची आणि मानवाच्या प्रगतीची मूलभूत शक्ती आहे. शिक्षणाच्या माध्यमातूनच व्यक्तीचे चारित्र्य घडते, समाजातील मूल्यव्यवस्था बळकट होते आणि राष्ट्राच्या प्रगतीचा पाया मजबूत होतो त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे ही केवळ शैक्षणिक जबाबदारी नसून सामाजिक आणि राष्ट्रीय कर्तव्य आहे असे म्हटले तर ते उचित ठरेल. आजच्या जागतिकीकरणाच्या आणि स्पर्धात्मक युगामध्ये शिक्षणाचा केवळ संख्यात्मक विकास होऊन चालणार नाही, तर विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास होणे अत्यंत महत्त्वाचे आहे म्हणूनच शैक्षणिक संस्थांच्या सर्व स्तरांवर गुणवत्तापूर्ण शिक्षण ही काळाची गरज बनली आहे.

रयत शिक्षण संस्थेने नेहमीच गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा ध्यास घेतला आहे. महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यात संस्थेचा कार्य विस्तार करून विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकासाबरोबरच शिक्षणप्रक्रिया अधिकाधिक सक्षम करण्याचा अखंड प्रयत्न केला आहे. तथापि गेल्या काही वर्षांमध्ये विद्यार्थी संख्येमध्ये होत असलेली घट लक्षात घेता या शिक्षणप्रक्रियेमध्ये काळानुरूप काही बदल करण्यासंदर्भात चिंतन करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष मा. खा. शरदरावजी पवारसाहेब यांच्या अध्यक्षतेखाली दि. ८ मे २०२५ रोजी मॅनेजिंग कौन्सिलच्या सातारा येथील बैठकीत 'शैक्षणिक गुणवत्ता विकास' याबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीमध्ये शैक्षणिक गुणवत्ता विकासाबाबत मॅनेजिंग कौन्सिलची विशेष बैठक आयोजित करून याबाबत समग्र चर्चा व्हावी व निश्चित स्वरूपाचे धोरणात्मक निर्णय घेण्यात यावे, असे ठरविण्यात आले होते. सदर बैठकीमधील मार्गदर्शक सूचना मध्यवर्ती ठेवून संस्थेच्या विविध शाखांचा शैक्षणिक, पायाभूत आणि भौतिक सुविधांच्या विकासाबाबत विचारविनिमय सुरु केला. दरम्यान इंटरॅक्टिव्ह पॅनल, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अभ्यासक्रम, संशोधन व विकास धोरण सर्व शाखांत माजी विद्यार्थी संघाची स्थापना यांसारखे अनेक शैक्षणिक उपक्रम हाती घेऊन घटत्या विद्यार्थी संख्येला आळा घालण्याबरोबरच गुणवत्तापूर्ण शिक्षणाला अग्रक्रम दिला असून त्यादृष्टीने सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू आहेत.

प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन या सर्वच स्तरांवर शिक्षणाची संरचना आणि अपेक्षा वेगवेगळ्या असल्या तरी प्रत्येक स्तरावर गुणवत्ता हीच मूलभूत कडी आहे. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक आणि

सामाजिक विकासाचा पाया प्राथमिक शिक्षणात घातला जातो. त्याचबरोबर माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार प्राप्त होतो. उच्च माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांची भविष्यातील दिशा आणि विचारप्रक्रिया स्पष्ट होते आणि महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांच्या ज्ञान, कौशल्य आणि मूल्यांची परिपक्वता साध्य होते. त्यामुळे प्रत्येक स्तरावर शैक्षणिक गुणवत्ता विकास ही एक अखंड चालणारी प्रक्रिया असली पाहिजे.

रयत शैक्षणिक गुणवत्ता विकास प्रकल्पाचा प्रमुख उद्देश म्हणजे शिक्षणप्रक्रियेची एकूण कार्यक्षमता वाढविणे, अध्ययन, अध्यापन, संशोधन प्रक्रिया अधिक परिणामकारक करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये जीवनावश्यक कौशल्यांचा विकास घडविणे हा आहे. या प्रकल्पांतर्गत शिक्षक, विद्यार्थी, पालक, समाज आणि शिक्षण संस्था या सर्व घटकांचा परस्पर समन्वय अत्यंत महत्त्वाचा आहे. शिक्षणातील नवोपक्रम, संशोधनाधारित पद्धती, तंत्रज्ञानाचा वापर, सातत्यपूर्ण मूल्यमापन, शिक्षक प्राध्यापकांचे प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे सहशालेय उपक्रम यांचा समावेश या विकास आराखड्यात महत्त्वाचा घटक ठरतो.

प्राथमिक शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या प्रवासातील पहिला टप्पा आहे. या टप्प्यावर शिकण्याची आवड आणि कुतूहल निर्माण करणे अधिक महत्त्वाचे असते. त्यामुळे या स्तरावर शिक्षण अधिक आनंददायी, प्रयोगशील आणि विद्यार्थीकेंद्रित असावे. वाचन, लेखन, गणित, भाषिक कौशल्ये याबरोबरच नैतिक मूल्ये, स्वच्छता, सहकार्य इत्यादींचा विकास करण्यावर भर देणे महत्त्वाचे आहे. शिक्षकांसाठी नियमित प्रशिक्षण, शैक्षणिक साधनांचा प्रभावी वापर, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि पालक सहभाग वाढविणे हे या स्तरावरील गुणवत्ता विकासाचे महत्त्वाचे घटक ठरतील.

माध्यमिक शिक्षण हा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक आणि भावनिक विकासाचा अत्यंत महत्त्वाचा निर्णायक टप्पा आहे. या टप्प्यावर विषयांचे सखोल ज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन, वैचारिक दिशा आणि आत्मविश्वास वाढविणे गरजेचे असते. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षांपर्यंत मर्यादित ठेवण्याऐवजी प्रकल्पाधारित शिक्षण, सादरीकरण, संवाद कौशल्य आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्यावर भर देणे गरजेचे आहे. शिक्षकांनी नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना प्रयोगशील आणि विचारशील बनविणे. तसेच सहशालेय उपक्रम, कला, क्रीडा, संस्कृती आणि समाजसेवा यांद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचे उद्दिष्ट ठेवणे गरजेचे आहे.

या टप्प्यावर विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी दिशा देणे हे शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट असते. विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षण किंवा व्यावसायिक क्षेत्रातील संधी यासाठी विषयांचा सखोल अभ्यास, मार्गदर्शन, करिअर समुपदेशन आणि कौशल्याधारित कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. या स्तरावर गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांचे विषयानुरूप प्रशिक्षण, डिजिटल साधनांचा वापर, स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी आणि विद्यार्थ्यांच्या सर्जनशील क्षमतेचा विकास यावर विशेष भर देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जबाबदारी आणि नेतृत्वगुण वाढविण्याचे प्रयत्नही याच माध्यमातून होऊ शकतात.

उच्च शिक्षण विभागाकडे गुणवत्ता वाढीचा अर्थ केबळ निकसल वाढविणे नव्हे, तर संशोधन, नवोपक्रम, उद्योजकता आणि सामाजिक बांधीलकी यांवर आधारित शिक्षण देणे हा होय. या टप्प्यावर विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर, कौशल्यसंपन्न आणि मूल्याधिष्ठित बनविणे आवश्यक आहे. प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांमध्ये ज्ञाननिमिवाची संस्कृती रूजविणे, तंत्रज्ञानाधारित अध्यापन, उद्योग सहकार्य, इंटर्नशिप, संशोधन प्रकल्प आणि सामाजिक उत्तरदायित्व कार्यक्रम या माध्यमातून गुणवत्ता वाढ साध्य करता येईल. तसेच NAAC, NIRF सारख्या मूल्यांकनाच्या प्रक्रियेतून संस्थात्मक गुणवत्ता सुनिश्चित करण्याची दिशा मिळू शकेल.

गुणवत्ता वाढ प्रकल्प हा केबळ शैक्षणिक सुधारणांपुरता मर्यादित न राहता संपूर्ण शैक्षणिक सांस्कृतिक बदल घडविण्याचा प्रयत्न आहे. शिक्षणातील गुणवत्तेचे सर्व घटक, शिक्षकांची बरर्थालकी, विद्यार्थ्यांची जिज्ञासा, व्यवस्थापनाचा पाठिंबा, पालकांचा सहभाग आणि समाजाचे सहकार्य हे सर्व घटक एकत्र आल्याशिवाय गुणवत्ता विकास होणार नाही. त्यामुळे या प्रयत्नात सर्व घटकांना सहभागी करून घेऊन गुणवत्तेसाठी सर्वांचा सहभाग ही भूमिका स्वीकारणे महत्वाचे आहे.

या प्रकल्पाच्या यशस्वितेसाठी सातत्यपूर्ण मूल्यमापन, अभिप्राय प्रेरणा व प्रोत्साहन योजना, तंत्रज्ञानावर आधारित डेटा व्यवस्थापन आणि शैक्षणिक नवोपक्रमांची देहाणघेवाण या सर्व गोष्टींचा उपयोग महत्वाचा ठरतो. रयत शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा २०१६ हा तीन स्वतंत्र खंडांमध्ये (भाग एक, भाग दोन आणि भाग तीन) विकसित करण्यात आलेला असून संस्थाच्या सर्व शैक्षणिक शाखांसाठी गुणवत्ता वृद्धीचे सर्वसमावेशक मार्गदर्शक दस्तऐवज म्हणून त्याची निर्मिती करण्यात आली आहे.

भाग एक हा प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागांसाठी तयार करण्यात आला असून या स्तरांवरील शाखांनी शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा कशा पद्धतीने तयार करावा, साईदर्भातील सविस्तर मार्गदर्शन समाविष्ट आहे, भाग दोन हा उच्च शिक्षण विभागासाठी तयार करण्यान आलेला असून कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयांनी गुणवत्ता विकास आराखडा तयार करताना अनुसरणाच्या मार्गदर्शक सूचना त्यामध्ये दिलेल्या आहेत.

भाग एक आणि भाग दोन या दोन्ही खंडांमधील इमारत बांधकाम, पायाभूत सुविधा व भौतिक सुविधा विकास आराखडा ही प्रकरणे समान स्वरूपाची आहेत. या प्रकरणामध्ये शैक्षणिक संस्थांच्या इमारत बांधकामसंदर्भातील नियम, नियोजनाची तत्वे, तसेच प्रत्येक शाखेमध्ये आवश्यक असणान्या पायाभूत सुविधा व भौतिक सुविधांचा सविस्तर आढावा देण्यात आलेला आहे. प्रत्येक शैक्षणिक शाखेमध्ये गुणवत्तापूर्ण अध्यापन-अध्ययन प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या सुविधा कोणत्या असाव्यात, त्यांचे नियोजन कसे करावे आणि त्यांचा विकास कोणत्या पद्धतीने करावा, याविषथी सुम्यूष्ट मार्गदर्शन या प्रकरणामध्ये करण्यात आले आहे.

भाग तीन मध्ये प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षण विभागांसाठी शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा तयार करण्यात मनुसे समाविष्ट करण्यात आले असून, त्यांच्या प्रकरण एक मध्ये आराखडा तयार करण्याची संपूर्ण कार्यपद्धती, आवश्यक बाबी आणि मार्गदर्शक तत्वे स्पविस्तरपणे स्पष्ट करण्यात आली आहेत. संस्थेच्या सर्व शाखांनी आपला शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा भाग तीनमध्ये मनुर्व केलेल्या ममुन्यांनुसार व मार्गदर्शक सूचनांनुसार तयार करणे अपेक्षित आहे. चा संपूर्ण प्रक्रियेदरम्यान संस्थेचे अधिकारी व पदाधिकारी शाखाप्रमुखांनी सातत्याने मार्गदर्शन करताल, आवश्यक ते सहकार्य उपलब्ध करून देतील आणि गुणवत्ता विकास आराखडयांच्या निर्मितीपस्ते ते त्यांच्या प्रभावी अमलबजावणीपर्षत आवश्यक समन्वय साधतील.

शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा २०२६ च्या भाग एक आणि भाग दोनमध्ये मनुर्व केलेल्या निकषांच्या आधारे प्रत्येक शाखेने आपला शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा तयार करावा, संबंधित आराखडयास संस्थास्तरावर आवश्यक मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्याची नियांत्रमबद्ध, टप्प्याटप्प्याने आणि परिणामकारक अमलबजावणी करावी.

दोन शब्द



श्री. विकास देशमुख IAS (Retd.)
सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात राहणाऱ्या बहुजन समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी व त्या माध्यमातून बहुजन समाजातील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना राष्ट्रीय विकासात आपले महत्त्वपूर्ण योगदान देता यावे यासाठी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ०४ ऑक्टोबर १९१९ मध्ये रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली.

शिक्षण हेच सामाजिक परिवर्तनाचे एकमेव प्रभावी साधन आहे हे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अचूक ओळखले होते म्हणूनच त्यांनी कुपर, किर्लोस्कर यासारख्या कंपन्यांमध्ये असलेली चांगल्या पगाराची नोकरी सोडून शिक्षणासारख्या महत्त्वाच्या विषयाला स्पर्श केला. कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याची तीन महत्त्वाच्या वैशिष्ट्यांची याठिकाणी नोंद घेता येईल. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात सर्व जातिधर्माच्या मुलांना एकाच वसतिगृहात प्रवेश देऊन एक अभिनव प्रयोग केला. त्यानंतर अत्यंत प्रतिभावान असलेल्या मुलांना केवळ आर्थिक परिस्थिती नाही म्हणून त्यांचा शिक्षणाचा हक्क डावलला जाऊ नये यासाठी 'कमवा आणि शिका' सारखी योजना कार्यान्वित केली. या योजनेला आज जागतिक मान्यता मिळाली आहे. सर्वात महत्त्वाचा शैक्षणिक प्रयोग म्हणजे कर्मवीरांनी आपल्या शैक्षणिक कार्याची सुरूवात व्हॉलंटरी शाळांपासून करून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंतचा शैक्षणिक पिरॅमिड उभा केला. चांगला आणि आदर्श विद्यार्थी निर्माण करावयाचा असेल, तर विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया (प्राथमिक शिक्षण) भक्कम असला पाहिजे, ही त्यांची भूमिका होती.

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी प्रारंभीच्या काळापासूनच शिक्षणाच्या संख्यात्मक विकासाबरोबर गुणवत्तापूर्ण विकास झाला पाहिजे हा आग्रह धरला. त्यासाठी शिक्षणाच्या पायाभूत, भौतिक आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध केल्या. शिक्षकांसाठी प्रशिक्षण महाविद्यालयांची स्थापना केली. हा त्यांचा दूरदृष्टीचा विचार आजही अत्यंत निष्ठेने आणि प्रयत्नपूर्वक जोपासला जात आहे. परिवर्तनशीलता हा समाजाचा स्थायीभावच आहे. ज्याप्रमाणे समाजाच्या गरजा काळानुरूप बदलत गेल्या त्याप्रमाणे कर्मवीरांनीसुध्दा आपल्या कालखंडात अनेक शैक्षणिक प्रयोग केले. केवळ पारंपरिक शिक्षण विद्यार्थ्यांना न उपलब्ध करून देता शेतीशाळा,

आय. टी. आय, डी. एल. एड. प्रशिक्षण असा प्रयोगातून शिक्षण व्यववाया सक्षम करण्यता प्रयत्न त्यांनी केलेला दिसून येतो.

कर्मवीरांच्या नंतर त्यांची शैक्षणिक भूमिका मध्यवर्ती ठेवून, काळाच्या गरजा ओळखून आपल्या शैक्षणिक धोरणात संस्थेने सकारात्मक बदल केले आहेत. कर्मचर विद्यार्थ्यामधिनीची शैक्षणिक विभाग म्हणून स्वतंत्र निर्मिती, निवासी गुरुकुल, अभिवाली गुरूकुल, दूस्थ्य गुरूकुल प्रकल्प, इंग्रजी संभाषण प्रशिक्षण वर्ग, रयत टॅलंट सर्ज, ट्रॅजेबंटी संशोधन पत्रिका, जैनतंत्रज्ञान, रयत विज्ञान परिषद, सेंटर फॉर इंन्व्हेशन, इंन्व्हेंशन ॲन्ड इन्स्युबेशन (CII), संगणक शिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, सर्व शाखांमध्ये असलेल्या वागीवाल्यांमध्ये इंटरन्नेटटद्द पंततंची व्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता अभ्यासक्रम, संशोधन व विकास कक्ष, माजी विद्यार्थी संघांची सर्व शाखांमध्ये स्थापना यासरडो प्रयत्न करून विद्यार्थ्याबरोबरच शिक्षण प्रक्रिया अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे.

तथापि, गेल्या काही वर्षात शैक्षणिक क्षेत्रातील विद्यार्थी संख्या कमी होताना दिसून येत आहे. याला अनेक घटक कारणीभूत आहेत. त्यामध्य ग्रामीण भागातील पालकांचे शहराकडे होत असलेले स्थलांतर, दळणवळणाच्या सुविधा, समाजातील वाढती स्पर्धा, निधंवित लोकसंख्या याबरोबरच शैक्षणिक सुविधांचा अभाव, प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता, शिक्षणासंदर्भातील पायाभूत शैक्षणिक सुविधांमध्ये असलेल्या कमतरता यामुळे विद्यार्थी संख्या कमी होत आहे. ही बाब लक्षात घेऊन ग्रामीण महाराष्ट्रातील विद्यार्थ्याना चांगल्या शैक्षणिक, भौतिक व पायाभूत सुविधा निर्माण करून देण्याची भूमिका संस्थेने अध्यक्ष मा. शरदावजी पवारसाहेब यांनी घेतली असून लगइहोगमे प्रयत्न केले जात आहेत. यावर्षी ८ मे २०२५ रोजी कर्मवीर पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला मा. खा. शरदावजी पवारसाहेब यांच्या अध्यक्षतेखाली मर्मिजा कौन्सिलच्या सर्व सन्माननीय सदस्यांबरोबर रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढ या विषयावर विस्ताराने चर्चा करण्यात आली आणि त्यासंदर्भातील आराखडा तयार करून योग्य ती खबरदारी आणि उपाययोजना करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

त्याप्रमाणे संस्थेचे चेअरमन मा.चंद्रकांत दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये सहकार्ग असणार, संस्थेच्या विविध शाखांमध्ये सर्वात्तच कार्य करणा-या शिक्षकांचा अभ्यासगट निर्माण करण्यात आला. विशेषतः कर्मवीर विद्याप्रबोधिनीच्या माध्यमातून संस्थेच्या गुणात्मक विकासासाठी जे उपक्रम राबविले जातात, त्यामध्ये सहकागी लग अभ्यासात्या शिक्षकांचे अभ्यासगट तयार करून त्यांचोबर संस्थेचा गुणवत्ता विकास आराखडा तयार करण्यासाठी ज्या घटकांची आवश्यकता आहे, त्यावर विस्ताराने चर्चा करण्यात आली व त्यांच्या सहकार्यातून संस्थेचा सन २०२५-२६ चा गुणवत्ता विकास आराखडा प्रस्तावित करण्यात आला आहे. मागील सहा महिने या विषयावर सातत्याने काम करून संस्थेच्या सर्व शाखांमध्ये अभ्यासत्या विद्यार्थ्याची गुणवत्ता वाढ व्हावी, त्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्राथमिक, माध्यमिक, उच्च

माध्यमिक आणि महाविद्यालयीन स्तरावर तज्ज्ञ शिक्षकांचे अभ्यासमट तयार करण्यात आले. त्या माध्यमातून आजच्या सामाजिक गरजा, औद्योगिक, शैक्षणिक, संशोधन क्षेत्रात आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाची असलेली गरज त्यात्त घेऊन पुढील दहा वर्षात निर्माण होणारी स्पर्धा आणि विविध क्षेत्रातील संधां या सर्व घटकांचा अभ्यास करून स्वत शिक्षण संस्थेचे शैक्षणिक धारण निश्चित करण्यासाठी काम करण्यात आले. या सर्व अभ्यास गटाच्या विचार मंथनातून काही ठोस निष्कर्ष पुढे आले, त्यामधून काही उपाययोजना मांडण्यात आल्या. सदर उपाययोजनांच्या शिफारशी अभ्यास गटाने संस्थेकड सुपर्द केल्या. यावर संस्थेचे चेअरमन मा. चंद्रकांत दळवी साहेब व इतर सन्माननीय मान्यवरांनी चर्चा करून त्यावर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी स्थत शिक्षण संस्थेचा शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडयाचे प्रारूप तयार करण्यात आले आहे.

शैक्षणिक उपाययोजनांच्या बरोबरच सर्वांतत दर्जाची गुणवत्ता वाढ निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांना पाठाभूत सुविधा त्याबबरोवर भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे अत्यंत महत्वाचे आहे. भौतिक आणि पायाभूत सुविधांचे विद्यार्थ्यांच्या गुणवता वाढीमध्ये अनन्यसाधारण महत्व आहे. ही बाब लक्षात घेऊन सर्व प्रकारच्या पायाभूत आणि भौतिक सुविधा शाखेवर उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेच्या प्रत्येक शाखेमध्ये समिती स्थापन करून पुढील तीन वर्षाचा कृती आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे. त्याप्रम्राणे माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावर आज उपलब्ध असलेल्या भौतिक आणि पायाभूत सुविधा लक्षात घेऊन भविष्यामध्ये उपलब्ध करून देण्याच्या सुविधांचा कृती आराखडा तयार करून त्यासाठी आवश्यक असणारा अपेक्षित शाखानिहाय खर्च निश्चित करावा लागेल. या खर्चास शाखा समिती तसेच महाविद्यालय विकास समिती यामध्ये मंजूरी घेऊन निधी उपलब्धतेसाठी प्रयत्न करून त्यांच्या मार्गदर्शनानुसार पुढे योग्य ती कार्यवाही करावी, असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

चांगल्या शैक्षणिक सुविधा आणि शिक्षण क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वाप्र केल्यास कमी होणाऱ्या विद्यार्थी संख्येला निश्चितपणे आळा बसेल. त्याचबरोबर गुणवतांत्रवाढीस पोषक वातावरण निर्माण होईल. या भूमिकेतून स्वत शिक्षण संस्थेचा शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा प्रस्तावित करण्यात येत आहे. त्या संदर्भात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन स्तरावर विविध सम्रता निशपप करून त्याच्या कडून अहवाल घेतला असून त्यांनी केलेल्या शिफारशी चर्चेसाठी संनिर्विनें कौन्सिल समोर ठेवत आहेत.

याबाबतीत संस्थेचे अध्यक्ष मा. शरद पवार साहेबांच्या सुचनेनुसार संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलची विशेष बैठक घेण्यात आली. त्यामध्ये शैक्षणिक गुणवता विकास आराखडा यावर सविस्तर चर्चा करून आराखडयास अंर्तिम स्वरूप देण्यात आले आहे. या सर्व प्रयत्नातून स्यत शिक्षण संस्थेच्या विविध शाखामध्ये अध्ययन, अध्यापन आणि संशोधन करणारा शिक्षक व विद्यार्थी अधिक सक्षम करून महाराष्ट्रची शैक्षणिक, परंपरा अधिकाशिक समृद्ध करण्याचा प्रयत्न केला जाईल.



शाखा गुणवत्ता विकास : इमारत बांधकाम विकास 2026-27

अ.क्र.	तपशील	स्थिती
१	**संरक्षक भिंत**	
	१) संरक्षक भिंत आहे / नाही.	नाही
	२) नसल्यास किंवा अपूर्ण असल्यास बांधावयाच्या संरक्षक भिंतीची लांबी (रनिंग मीटरमध्ये)	199.00
	३) संस्थेच्या परिपत्रकाप्रमाणे निवडलेल्या नमुन्यानुसार प्रतिमिटर अंदाजित खर्च	11430.00
	४) एकूण अंदाजित खर्च	2274570.00
२	**कमान व प्रवेशद्वार**	
	१) कमान व प्रवेशद्वार उपलब्ध आहे का ?	आहे
	२) नसल्यास, बांधावयाच्या कमानीचा व प्रवेशद्वाराचा अंदाजित खर्च	0.00
३	**वर्गखोल्या**	
	अ) नवीन वर्गखोल्या बांधणे	
	१) वर्गखोल्या किती आहेत ?	56
	२) वर्गखोल्या पुरेशा आहेत का ?	नाही
	३) पुरेशा नसल्यास किती नवीन वर्गखोल्या बांधावयाच्या आहेत ?	15
	४) नवीन वर्गखोल्या बांधकामाचा अंदाजित खर्च	19125000.00
	ब) जुन्या वर्गखोल्यांचे नूतनीकरण करणे	
	१) नूतनीकरण करावयाच्या वर्गखोल्यांची संख्या	8
	२) नूतनीकरणासाठी अंदाजित एकूण खर्च	1501500.00
४	**शाखा प्रमुख कार्यालय**	
	१) शाखा प्रमुखाच्या कार्यालयाचे एकूण क्षेत्रफळ (चौ.मी.)	42.00
	२) शाखा प्रमुख कार्यालयाच्या नुतनीकरणाचा अंदाजित खर्च	100000.00
५	**अवॉर्ड/पुरस्कार ठेवण्याची जागा**	
	१) यासाठी जागा निश्चित केली आहे का ?	आहे

	२) किती व कोठे ?	22 x 36 चौ. फूट. मुख्य प्रशासकीय इमारती मध्ये स्वतंत्र जागा - कर्मवीर दालन
	३) नसल्यास, जागा तयार करण्यासाठी येणारा अंदाजित खर्च.	-
६	**शाखा कार्यालय**	
	१) शाखेत शाखा कार्यालय आहे / नाही ?	आहे
	२) ------- चौ. मी. शाखा कार्यालयाच्या नूतनीकरणाचा अंदाजित खर्च	0.00
७	**प्राचार्यांचे निवासस्थान**	
	१) शाखेच्या परिसरात प्राचार्यांचे निवासस्थान आहे का ?	आहे
	२) असल्यास, त्याचा वापर केला जातो का ?	होय
	३) नसल्यास, प्राचार्यांचे निवासस्थान बांधण्यासाठी येणारा अंदाजित खर्च नमूद करावा.	-
८	**स्टाफ रूम**	
	१) स्टाफरूमसाठी स्वतंत्र जागा/खोली उपलब्ध आहे का ?	नाही
	२) नसल्यास, निश्चित करावी. निश्चित केलेल्या खोलीचे क्षेत्रफळ किती ?	58.96
	३) स्टाफ रूमच्या नूतनीकरणासाठी येणारा अंदाजित खर्च	800000.00
९	**सभागृह**	
	१) शाळेसाठी सभागृहाची व्यवस्था आहे का ?	नाही
	२) नसल्यास, किती क्षमतेचे सभागृह बांधावयाचे आहे ?	750 बैठक व्यवस्था असणारे
	३) किती क्षेत्रफळाचे सभागृह बांधावयाचे आहे ?	16000.00
	अ) सभागृह RCC बांधावयाचे असल्यास अंदाजित खर्च	80000000.00
	ब) पत्र्याचे सभागृह बांधावयाचे झाल्यास अंदाजित खर्च	0.00
१०	**वसतिगृह**	
	१) शाळेसाठी वसतिगृहाची आवश्यकता आहे का ?	नाही
	२) असल्यास, मुलांसाठी कि मुलींसाठी आणि किती विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह ?	-
	३) वसतिगृह बांधकामाचे अंदाजित क्षेत्रफळ किती आहे ?	-
	४) आणि त्यासाठी अंदाजित खर्च किती ?	-
११	**उताराचा रस्ता (रॅम्प)**	
	१) प्रत्येक इमारतीसाठी रॅम्प आहे का ?	आहे
	२) नसल्यास, किती इमारतींना रॅम्प बांधावा लागेल.	0
	३) रॅम्प बांधण्यासाठी अंदाजे किती खर्च येईल.	0.00
१२	**स्वच्छतागृह**	
	१) मुलांसाठी व मुलींसाठी पुरेशी स्वच्छतागृहे आहेत का ?	आहे

	२) असल्यास स्वच्छतागृह चांगली आहेत का ?	नाही
	३) चांगली नसल्यास सुधारणा करण्याची आवश्यकता आहे का ?	सुधारणा करणे आवश्यक आहे
	४) जुनी स्वच्छतागृहे चांगली नसल्यास आणि सुधारणा करता येण्यासारखी नसल्यास नवीन बांधावी लागतील का ?	नाही
	५) आणि त्यासाठी किती खर्च येईल	1000000.00
१३	**सेवक व अभ्यागतांसाठी स्वच्छतागृहे**	
	१) सेवक व अभ्यागतांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे आहेत का ?	नाही
	२) नसल्यास, महिलांसाठी व पुरुषांसाठी अशी दोन स्वच्छतागृहे बांधावी लागतील का ?	आहे
	३) त्यासाठी अंदाजे किती खर्च येईल ?	700000.00
१४	**रेन वॉटर हार्वेस्टिंग**	
	१) शाखेत रेन वॉटर हार्वेस्टिंग आहे का ?	आहे
	२) नसल्यास, काय सुविधा केली पाहिजे ?	
१५	**गेस्ट रूम / गेस्ट हाऊस (अतिथी कक्ष)**	
	१) शाखेत गेस्ट रूम / गेस्ट हाऊस उपलब्ध आहे का ?	आहे
	२) असल्यास, किती व्यक्तींची सोय केली जाते ?	8
	३) नसल्यास, उपलब्ध करणे शक्य आहे का ?	-
	४) त्यासाठी अंदाजे किती खर्च येऊ शकतो ?	-
१६	**रंग संगती**	
	१) संस्थेतील सर्व शाखांच्या सर्व इमारती आतून, बाहेरून संस्था ठरवून देईल त्या रंगामध्ये एकसारख्या रंगवायच्या आहेत. इमारतींचा रंग उत्तम असल्यास लगेच बदलायची आवश्यकता नाही. जेव्हा इमारतींना पुन्हा रंग देण्याचे ठरेल तेव्हा संस्थेने ठरवून दिलेला रंग द्यावा. नवीन बांधलेल्या इमारती संस्थेने दिलेल्या रंगामध्ये रंगवायच्या आहेत.	
	२) इमारतीचा बाह्य रंग बदलावयाचा असेल तेव्हा त्यासाठी आजच्या दराने अंदाजे किती खर्च येईल ?	1800000.00
	३) इमारतीचा आतील रंग संस्थेने ठरवून दिल्याप्रमाणे जेव्हा रंगवायचा असेल तेव्हा त्यासाठी आजच्या दराने किती खर्च येईल ?	3000000.00
१७	टिप्पणी/सूचना	१. महाविद्यालयास स्वतंत्र प्रशासकीय इमारतीची आवश्यकता आहे. त्यासाठी अंदाजे खर्च 30000000/- अपेक्षित आहे. २. महाविद्यालयास प्रवेशद्वार असून त्याचे आधुनिकीकरण (बायोमेट्रिक सिस्टीम) करणे आवश्यक आहे. त्यासाठी अंदाजे खर्च 8,50,000/- अपेक्षित आहे.

स्वाक्षरी



शाखा गुणवत्ता विकास : पायाभूत सुविधा विकास 2026-27

अ.क्र.	तपशील	स्थिती
१	**पिण्याच्या पाण्याची व्यवस्था**	
अ)	**उपलब्धता**	
	१) पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था आहे का ?	आहे
	२) नसल्यास, काय वाढीव व्यवस्था करणार ?	
	३) त्यासाठी अंदाजित खर्च किती येईल.	
ब)	**विद्यार्थ्यांसाठी**	
	१) विद्यार्थ्यांना पाणी पिण्यासाठी काय व्यवस्था केली आहे आणि ती पुरेशी आहे का ?	१००० लि. प्रती तास क्षमतेचे ४ आरओ प्लांट आहेत, पाणी व्यवस्था पुरेशी आहे.
	२) नसल्यास काय व्यवस्था करणार आणि त्यासाठी किती खर्च येईल ?	
क)	**इतर वापरासाठी पाण्याची व्यवस्था**	
	१) लॅन्ड स्केपिंग,वृक्ष लागवड,उपलब्ध जमिनीचा शेतीसाठी / फळबागेसाठी वापर करण्यासाठी पुरेशा पाण्याची उपलब्धता आहे का ? आणि असल्यास काय व्यवस्था आहे ?	नाही
	२) नसल्यास, वापरासाठी पुरेसे पाणी उपलब्ध करून घेण्यासाठी काय पर्यायी व्यवस्था करण्यात येईल जसे विहीर, विधन विहीर, किंवा इतर व्यवस्था, त्यासाठी अंदाजे किती खर्च येईल.	५ बोअरवेलने पाणी पुरवठा होतो, परंतु क्षार जास्त असल्याने दुरुस्ती खर्च जास्त होतो, त्यासाठी २ लक्ष लि. क्षमतेची टाकी बांधणे आवश्यक आहे. 3774000.00
२	**सांडपाणी व्यवस्थापन**	
	१) पिण्याच्या पाण्याचे सांडपाणी व्यवस्थापन आहे का ?	नाही
	२) स्वछतागृहाच्या पाण्याच्या सांडपाण्याचे व्यवस्थापन आहे का ?	नाही
	३) इतर वापराच्या पाण्याच्या सांडपाण्याचे व्यवस्थापन आहे का ?	नाही

अ.क्र.	तपशील	स्थिती
	४) ज्या प्रकारच्या सांडपाण्याचे व्यवस्थापन नाही त्याचे व्यवस्थापन करण्यासाठी काय उपाययोजना करणार ? त्यासाठी अंदाजे किती खर्च येईल ?	**उपाययोजना :** सेंट्रल ड्रेनेज सिस्टमच्या माध्यमातून सांडपाण्याचे व्यवस्थापन करावे लागणार आहे **अंदाजित खर्च :** 1382846.00
३	**घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छता**	
	१) इमारती आणि इमातीच्या परिसराची दररोज स्वच्छता करण्यात येते का आणि कशा प्रकारे ?	होय
	२) जर स्वच्छतेची नियमित व्यवस्था नसेल तर काय व्यवस्था करण्यात येईल व त्यासाठी अंदाजित वाढीव खर्च किती येईल.	

अ.क्र.	तपशील	स्थिती
४	**खेळाचे मैदान/ क्रिडांगण/व्यायामशाळा**	
	१) वरील व्यवस्थांपैकी कोणत्या व्यवस्था आहेत ?	स्वतंत्र क्रीडांगण उपलब्ध आहे. • कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, फुटबॉल, क्रिकेट, हँडबॉल, हॉकी, सॉफ्टबॉल, बेसबॉल, टेबल टेनिस, कुस्ती, ज्युडो, बास्केटबॉल, बॉक्सिंग, तायक्वांदो, फेन्सिंग (तलवारबाजी), बॅडमिंटन, वुशू, स्क्वॉश, रॅकेट स्पोर्ट्स, बॉडीबिल्डिंग आणि योगासने यांसारख्या खेळांचा समावेश आहे. • पॉवरलिफ्टिंग, वेटलिफ्टिंग, ४००-मीटरचा ६-लेन धावण्याचा मार्ग (ॲथलेटिक्स) तसेच मैदानी आणि इनडोअर खेळांसाठी सुविधा उपलब्ध आहेत. • इनडोअर खेळांसाठी एक स्वतंत्र हॉल उपलब्ध आहे. • विद्यापीठ-स्तरीय, विभागीय आणि आंतर-महाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत.
	२) ज्या व्यवस्था नाहीत त्यापैकी कोणत्या व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे.	• आधुनिक व अद्ययावत बहुउद्देशीय जिम्नॅशियम विकसित करणे • रनिंग ट्रॅक चे ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या मानकानुसार नूतनीकरण करणे व सिंथेटिक ट्रॅक निर्मिती करणे • कबड्डी, खो-खो व व्हॉलीबॉल मैदानांचे मानकानुसार नूतनीकरण करणे • ओपन जिम तयार करणे • आर्चरी (धनुरविद्या) या क्रीडा प्रकारा करिता टारगेट रेंज तयार करणे • इनडोअर हॉलच्या वर एक मल्टीपर्पज हॉल बांधणे • दहा मीटर शूटिंग रेंज तयार करणे • हॉकी, हॅन्डबॉल व फुटबॉल या खेळासाठी मुव्हेबल गोल पोस्ट खरेदी करणे • डे नाईट स्पर्धा साठी क्रीडांगणावर फ्लड लाईट बसवणे
	३) प्रस्तावित व्यवस्था करण्यासाठी जमीन उपलब्ध आहे का ?	आहे
	४) वरील अ.क्र. २ मधील विचाराधीन व्यवस्था निर्माण करण्यासाठी अंदाजे किती खर्च येईल ?	5000400.00
५	**परिसर उद्यान व वृक्ष लागवड**	
	१) शाखेसाठी परिसर उद्यान आहे का ?	आहे
	२) नसल्यास, त्यासाठी जागा उपलब्ध आहे का ?	
	३) असल्यास, उपलब्ध जागेत, शोभेची झाडे, लॉन, वृक्षलागवड करण्यात यावी.त्यासाठी अंदाजित किती खर्च येईल.	0.00
	४) शाखेमध्ये वृक्षलागवडीची नोंदवही ठेवली आहे काय व ती दरवर्षी अद्ययावत करण्यात येते काय ?	होय
६	**खेळाचे साहित्य**	

अ.क्र.	तपशील	स्थिती
	१) खेळाचे साहित्य पुरेसे आहे का ? नसल्यास खरेदी करावे.	नाही सध्या मूलभूत खेळाचे साहित्य उपलब्ध आहे तथापि विद्यापीठ, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा लक्षात घेता अद्ययावत व दर्जेदार साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. हॉकी, हँडबॉल व फुटबॉल या खेळासाठी मुव्हेबल गोल पोस्ट आर्चरी सेट, सिंगल स्टेशन जिम मशीन, डंबल सेट, मल्टीपर्पज मॅटस, फेन्सिंग इलेक्ट्रिक मॅच सेट अँड स्वार्ड, टग ऑफ वॉर रोप, एलीको वेटलिफ्टिंग अँड पावरलिफ्टिंग सेट, रनिंग हर्डल्स
	२) त्यासाठी किती खर्च येईल.	1274931.00
	३) खेळाचे साहित्य ठेवण्यासाठी व्यवस्था / खोली असावी, नसल्यास तशी व्यवस्था करावी.	आहे
७	**पर्किंग**	
	१) विध्यार्थ्यांच्या सायकली / मोटर सायकलींच्या पार्किंगसाठी व्यवस्था आहे का ?	आहे
	२) नसल्यास, करण्यात यावी व त्यासाठी जागा निश्चित करावी.	
	३) सेवक, पालक आणि शाखेस भेट देण्यासाठी येणारे अभ्यांगत (व्हीजी टर्स) यांच्या वाहनांसाठी पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था आहे का ? नसल्यास करावी व त्यासाठी जागा निश्चित करावी.	नाही
	४) विद्यार्थी, सेवक, पालक व अभ्यांगताच्या वाहनासाठी पार्किंग व्यवस्था करण्यासाठी अंदाजित किती खर्च येईल.	1200000.00
८	**नामफलक**	
	१) शाखेच्या नावाचा फलक,इमारतीचे नावे, वर्गखोल्या, प्रयोगशाळा,ग्रंथालय इत्यादींसाठी नावाचे फलक आहेत का ? नसल्यास असे फलक लावण्यात यावेत.	आहे
	२) त्यासाठी अंदाजे किती खर्च येईल ?	

अ.क्र.	तपशील	स्थिती
९	**विद्युत व्यवस्था**	
	१) इमारतीमध्ये सर्व ठिकाणी पुरेशी प्रकाश व्यवस्था आणि वायुविजन (पंखे) व्यवस्था आहे का ?	आहे
	२) नसल्यास तशी व्यवस्था करावी .	
	३) रात्रीच्या वेळी इमारतीच्या परिसरात पुरेशी प्रकाश व्यवस्था आहे का ? नसल्यास करावी.	आहे
	४) शाखेच्या प्रवेशद्वारावरील नामफलक आणि मुख्य इमारतीच्या नामफलकावर ऊत्तम प्रकाश व्यवस्था आहे का ? नसल्यास करावी. याठिकाणी शाखेच्या डीजीटल नामफलकाची व्यवस्था करावी.	आहे
	५) इमारती आणि शाखा परिसर,प्रवेशद्वार इत्यादी ठिकाणी पुरेशी विद्युत व्यवस्था करण्यासाठी अंदाजे किती खर्च येईल.	500000.00
१०	**सोलर एनर्जी**	
	१) शाखेमध्ये सोलर एनर्जीची व्यवस्था करण्यात आली आहे का ?	नाही
	२) नसल्यास, शाखेसाठी लागणारा पूर्ण वीजभार निश्चित करावा आणि तेवढा वीजभार सोलर एनर्जीमार्फत मिळवण्यासाठी नियोजन करावे. केलेल्या नियोजनाची माहिती द्यावी.	महाविद्यालयास एकूण 122 KW ची आवश्यकता आहे. तीन टप्प्यात 50, 50 व 22 KW सोलर पावर प्लांट बसविण्याचे नियोजन केले होते परंतु महाराष्ट्र शासन परिपत्रक, सहसंचालक, उच्च शिक्षण, कार्यालय दि. २१/०१/२०२६ नुसार स्थगिती असल्याने काम केले नाही.
	३) शाखेची पूर्ण गरज भागेल एवढी सोलर एनर्जी निर्माण करण्यासाठी अंदाजित किती खर्च येईल ?	6000000.00
११	**मालमत्ता देखभाल व दुरुस्ती**	
	१) इमारत व इमारतीचा परिसर स्वच्छ करण्याची काय व्यवस्था केली आहे ?	वर्ग ४ कर्मचाऱ्यांना परिसर नेमून दिला असून दररोज स्वच्छता करण्यात येते. रोजंदारी कर्मचारी यांचेकडून इतर परिसराची स्वच्छता करण्यात येते.
	२) शाखेचा पूर्ण परिसर आणि संरक्षण भिंतीच्या बाहेरचा परिसर आठवडयातून एकदा स्वच्छ करण्यासाठी काय व्यवस्था केली आहे का ?	आहे
	३) इमारतीची देखभाल व दुरुस्ती जसे, छत गळती, नळाची दुरुस्ती, दरवाजे, खिडक्या, फर्निचर इत्यादींची दुरुस्ती, विद्युत व्यवस्थेची दुरुस्तीची व्यवस्था आहे का ? असल्यास, काय व्यवस्था आहे ते द्यावी.	आहे इमारतीची देखभाल व दुरुस्ती जसे, छत गळती, नळाची दुरुस्ती, दरवाजे, खिडक्या, फर्निचर इत्यादींची दुरुस्ती, विद्युत व्यवस्थेची दुरुस्तीची व्यवस्था टेंडर पद्धतीने करण्यात येते.
	४) नसल्यास, काय व्यवस्था करण्यात येणार आहे ते द्यावी.	
	५) स्वच्छता, देखभाल व दुरुस्तीसाठी वार्षिक अंदाजे किती खर्च येईल ?	1000000.00

अ.क्र.	तपशील	स्थिती
	६) शाखेत करण्यात आलेल्या विविध बांधकाम / दुरुस्ती कामांची नोंदवही ठेवली आहे का ? ती वेळोवेळी अद्ययावत केली जाते का ?	हो
१२	**स्ट्रक्चरल ऑडिट**	
	१) शाखेच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे आवश्यक आहे का ?	नाही
	२) असल्यास, माहिती नमूद करावी.	
१३	टिप्पणी/सूचना	महाविद्यालयास एकूण 122 KW ची आवश्यकता आहे. तीन टप्प्यात 50, 50 व 22 KW सोलर पावर प्लांट बसविण्याचे नियोजन केले होते परंतु महाराष्ट्र शासन परिपत्रक, सहसंचालक, उच्च शिक्षण, कार्यालय दि. २१/०१/२०२६ नुसार स्थगिती असल्याने काम केले नाही.

स्वाक्षरी



शाखा गुणवत्ता विकास : भौतिक सुविधा विकास 2026-27

अ.क्र.	तपशील	स्थिती
१	**ग्रंथालय व अभ्यासिका**	
अ)	**ग्रंथालय**	
	१) शाखेमध्ये ग्रंथालय आहे का ?	आहे
	२) ग्रंथालयासाठी स्वतंत्र जागा/खोली आहे का ?	आहे
	३) नसल्यास, उपलब्ध इमारतीत स्वतंत्र ग्रंथालय करता येईल का ?	-
	४) नसल्यास, स्वतंत्र खोली/इमारत प्रस्तावित करावी ? त्यासाठी अंदाजे किती खर्च येईल.	
ब)	**अभ्यासिका**	
	१) शाखेमध्ये अभ्यासिका आहे का ?	आहे
	२) असल्यास स्वतंत्र जागेत आहे का ? कि ग्रंथालयासोबत त्याच जागेत अभ्यासिका आहे ?	ग्रंथालयात स्वतंत्र जागेत अभ्यासिका आहे
	३) अभ्यासिका नसल्यास, स्वतंत्र खोली/ हॉल /इमारत बांधवी. त्यासाठी अंदाजे किती खर्च येईल.	-
	सूचना : ग्रंथलयसोबत /जवळच /लागून/ अभ्यासिका निर्माण करावी.	
क)	**ग्रंथालय आणि अभ्यासिकेसाठी फर्निचर**	
	१) शाखेतील उपलब्ध फर्निचरचा वापर करावा.	अभ्यासिकेसाठी शाखेतील उपलब्ध फर्निचरचा वापर होत आहे.
	२) कमी पडणारे फर्निचर करण्यात यावे. त्यासाठी अंदाजे किती खर्च येईल.	0.00
२	**प्रयोगशाळा**	
अ)	**भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि वनस्पतीशास्त्र**	
	१) फिजिक्स, केमिस्ट्री आणि बॉटनी यासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा आहेत का ?	आहे
	२) नसल्यास, उपलब्ध इमारतीत ज्या विषयाच्या प्रयोगशाळा नाहीत त्या निर्माण कराव्यात.	- -

	३) उपलब्ध इमारतीत प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा नसल्यास नवीन खोल्या बांधून त्यामध्ये प्रयोगशाळा निर्माण कराव्यात. त्यासाठी किती वर्गखोल्या बांधाव्या लागतील व त्यासाठी अंदाजे किती खर्च येईल.	-

अ.क्र.	तपशील	स्थिती
	४) प्रत्येक प्रयोगशाळेत पुरेसे फर्निचर असावे. नसल्यास वाढवावे / नवीन करावे. त्यासाठी प्रयोगशाळानिहाय अंदाजे किती खर्च येईल.	आहे -
	५) प्रत्येक प्रयोगशाळेत किमान काय काय सुविधा / साहित्य असावे ? ते साहित्य प्रयोगशाळांमध्ये आहे का ? व ते पुरेसे आहे का ? नसल्यास प्रयोग शाळानिहाय कमी असलेले साहित्य खरेदी करावे. प्रयोगशाळा निहाय द्यावयाच्या साहित्याची यादी करावी. त्यासाठी प्रयोगशाळा निहाय अंदाजे किती खर्च येईल.	आहे - -
ब)	**भाषा, गणित इत्यादी.**	
	१) या विषयाच्या प्रयोगशाळा / लॅब आहेत का ?	आहे
	२) नसल्यास, त्यासाठी किती जागा/खोल्या लागतील.	-
	३) उपलब्ध इमारतीत या विषयाच्या प्रयोगशाळा करता येतील का ? असल्यास कराव्यात.	होय
	४) शक्य नसल्यास, नवीन खोली बांधण्यात यावी. त्यासाठी अंदाजे किती खर्च येईल.	-
	५) या विषयांच्या प्रयोगशाळांमध्ये पुरेसे फर्निचर व साहित्य आहे का ? नसल्यास घेण्यात यावे. त्यासाठी अंदाजे किती खर्च येईल.	नाही 992000.00
३	**उपहारगृह / कॅन्टीन / कॅफेटेटिया**	
	१) शाखेस उपहारगृहाची आवश्यकता आहे का ?	आहे
	२) असल्यास, उपलब्ध जागेत / इमारतीत पुरेशा जागेत उपहारगृहाची व्यवस्था करता येईल का ?	होय
	३) शक्य असल्यास शाखेसाठी उत्तम स्वतंत्र उपहारगृह करण्यात यावे. त्यासाठी अंदाजे किती खर्च येईल ?	0.00
	४) उपहार गृहाची आवश्यकता आहे परंतु उपलब्ध जागेत / इमारतीत ते करणे शक्य नसल्यास उपहारगृहासाठी नवीन खोली / हॉल बांधावा. बांधकामासह व फर्निचरसह अंदाजे किती खर्च येईल.	-
४	**मीटिंग हॉल / कॉन्फरन्स हॉल**	
	१) शाखेत मीटिंग / कॉन्फरन्स हॉल आहे का ?	नाही
	२) नसल्यास, उपलब्ध जागेत / इमारतीत कॉन्फरन्स हॉलची व्यवस्था करता येईल का ?	होय
	३) मीटिंग / कॉन्फरन्स हॉल फर्निचरसह तयार करण्यासाठी अंदाजे किती खर्च येईल.	1800000.00
५	**अभिलेख कक्ष (रेकॉर्ड रूम)**	
	१) शाखेत अभिलेख कक्ष (रेकॉर्ड रूम) आहे का ?	आहे
	२) नसल्यास, उपलब्ध जागेत / इमारतीत व्यवस्था करता येईल का ?	-
	३) अभिलेख कक्ष (रेकॉर्ड रूम) ची व्यवस्था करण्यासाठी अंदाजे किती खर्च येईल ?	-

अ.क्र.	तपशील	स्थिती
६	**डेडस्टॉक रूम**	
	१) शाखेत डेडस्टॉक रूमची व्यवस्था आहे का ?	आहे
	२) नसल्यास, उपलब्ध जागेत / इमारतीत व्यवस्था करता येईल का ?	-
	३) डेडस्टॉक रूमची व्यवस्था करण्यासाठी अंदाजे किती खर्च येईल ?	-
७	**व्हरांडा**	
	१) शाखेत व्हरांड्याची व्यवस्था आहे का ?	आहे
	२) नसल्यास, ही व्यवस्था करण्यात यावी. त्यासाठी अंदाजे किती खर्च येईल ?	-
८	**संगणक कक्ष**	
	१) विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेत शाखेत संगणक कक्ष पुरेसा आहे का ?	नाही
	नसल्यास, उपलब्ध जागेत / इमारतीत वाढीव संगणकाची व्यवस्था करावी.	व्यवस्था करावी
	२) संगणक कक्षाची वाढीव व्यवस्था करण्यासाठी अंदाजे किती खर्च येईल ?	12000000.00
९	**कृत्रिम बुद्धिमत्ता कक्ष**	
	१) शाखेत कृत्रिम बुद्धिमत्ता कक्ष आहे का ?	आहे
	२) नसल्यास, उपलब्ध इमारतीत कृत्रिम बुद्धिमत्ता कक्ष निर्माण करण्यात यावा.	-
	३) त्यासाठी स्वतंत्र खोली बांधावी. त्यासाठी अंदाजे किती खर्च येईल.	-
१०	**सेंट्रल ॲड्रेस सिस्टीम**	
	१) शाखेत सेंट्रल ॲड्रेस सिस्टीम व्यवस्था आहे का ?	नाही
	नसल्यास, उपलब्ध इमारतीत तशी व्यवस्था करण्यात यावी.	व्यवस्था करण्यात यावी
	२) सेंट्रल ॲड्रेस सिस्टीम व्यवस्था करण्यासाठी अंदाजे किती खर्च येईल ?	350000.00
११	**CCTV व्यवस्था**	
	१) शाखेत CCTV व्यवस्था कार्यान्वित आहे का ?	आहे
	२) असल्यास, किती दिवसांचा बॅकअप आहे ?	30 दिवस
	३) नसल्यास, CCTV व्यवस्था कार्यान्वित करण्यासाठी अंदाजे किती खर्च येईल ?	-

१२	टिप्पणी/सूचना	१. नवीन इमारत बांधकाम पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक वर्गखोलीत Interactive Panel बसविण्यासाठी 1350000/- व नवीन इमारत परिसरात CCTV बसविण्यासाठी 600000/- इतका येणार आहे. एकूण अंदाजे खर्च रु. 1950000/- इतका येणार आहे. २. संस्थेच्या परिपत्रकाप्रमाणे पुढील तीन वर्षांसाठी नवीन संगणक खरेदी करण्यासाठी अंदाजे खर्च रु. 12000000/- इतका येणार आहे. 3. शाखेत अभिलेख कक्ष (रेकॉर्ड रूम) असून प्रती वर्षी मेंटेनेंस साठी अंदाजे खर्च 150000.00

स्वाक्षरी



शाखा गुणवत्ता विकास : कला महाविद्यालये 2026-27

अ.क्र.	तपशील	स्थिती
१	**महाविद्यालयाची प्राथमिक माहिती**	
	१) स्थापना वर्ष	1965
	२) संपूर्ण पत्ता	कोपरगाव, तालुका- कोपरगाव, जि. अहिल्यानगर 423601
	३) मान्यता व संलग्नता	1965, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
	४) शाखा प्रमुखाचे नाव	प्राचार्य, डॉ. माधव तुकाराम सरोदे
	५) महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष	मा. संदीप गोरखनाथ वर्पे
	६) एकूण विद्यार्थी संख्या	462
	७) एकूण शिक्षक संख्या	28
	८) सध्यस्थितीत असलेला शिक्षक स्टाफ	१) नियमित : 11 २) CHB : 17 ३) लमसम : 0
	९) रिक्त शिक्षक संख्या	4
	१०) एकूण शिक्षकेतर सेवक	53
	११) सध्यस्थितीत असलेले शिक्षकेतर सेवक	१) नियमित : 46 २) लमसम : 0
	१२) आवश्यक शिक्षकेतर सेवक	9
	१३) एकूण वर्गखोल्या	56
	१४) जमिनीचे क्षेत्रफळ	22.04 एकर
	१५) क्रीडांगणाचे क्षेत्रफळ	217797.96 चौ. फुट.
	१६) माजी विद्यार्थी संघ नोंदणी क्रमांक	माजी विद्यार्थी संघ नोंदणी प्रक्रिया सुरु आहे.
२	**कला शाखेतील महत्त्वाच्या समस्या**	
	1) समस्या	१. विद्यार्थी प्रवेशात घट
	2) समस्या	२. रोजगारक्षमतेचा अभाव
	3) समस्या	३. इंग्रजी व संवाद कौशल्यांची कमतरता
	4) समस्या	४. पालक व समाजाचा कला शाखेकडे पाहण्याचा बदलता दृष्टिकोन

अ.क्र.	तपशील	स्थिती
३	**कला शाखेतील UG, PG, Research व इतर अभ्यासक्रम**	
	१) कला शाखेत सध्या कार्यरत असलेले अभ्यासक्रम कोणते ?	१) UG : ✓ २) PG : ✓ ३) Research : ४) Certificate / Diploma / Advance Diploma / Post Graduate Diploma : ✓
	२) कोणत्या नवीन अभ्यासक्रमाची आवश्यकता आहे ?	१. मानसशास्त्र (विशेष स्तर) २. संशोधन केंद्र: १. मराठी, २.इंग्रजी ३. भूगोल
	३) पुढील वर्षी कोणते अभ्यासक्रम सुरू करणार आहात ?	१. मानसशास्त्र (विशेष स्तर) २. संशोधन केंद्र: प्रथम वर्ष – भूगोल द्वितीय वर्ष – मराठी तृतीय वर्ष- इंग्रजी
४	**कौशल्य विकास केंद्र**	
	१) महाविद्यालयात स्वतंत्र कौशल्य विकास केंद्र सुरु आहे काय ?	आहे
	२) असल्यास, कौशल्य विकास केंद्राची रचना द्यावी.	President- Hon. Principal IQAC Coordinator Vice-Principal Coordinator Faculty Coordinator Course Coordinator External Experts प्रत्येक कोर्ससाठी स्वतंत्र अभ्यास मंडळ नेमलेले आहे. बाह्य तज्ज्ञांच्या मदतीने प्रत्येक कोर्सचा अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती व क्रेडिट्स ठरविले जातात.
	३) असल्यास, कोणते कोर्स सुरु आहेत ?	१. सर्टिफिकेट कोर्स इन मोडी लिपी २. Certificate Course in Remote Sensing and G.I.S. ३. Certificate Course in Personality Development ४. Certificate Course in English Communication ५. Certificate Course in Translation Skill ६. Certificate Course in Stock Market ७. Certificate Course in Beauty Parlour ८. Certificate Course in Journalisum
	४) नसल्यास, पुढील शैक्षणिक वर्षात कौशल्य विकास केंद्र स्थापन करणेबाबतची कार्यवाही नमूद करावी.	
	५) पुढील शैक्षणिक वर्षात कोणते कोर्सेस सुरु करणार आहात ?	१. Certificate Course in Agri-tech and Digital Farming २. Certificate Course in Local Tourism and Heritage Studies
५	**शेती व शेतीसंलग्न कोर्सेस**	
	१) महाविद्यालयात शेती व शेतीसंलग्न कोर्सेस सुरू आहे का ?	नाही
	२) असल्यास, कोणते कोर्स सुरू आहेत ?	-
	३) नसल्यास, पुढील शैक्षणिक वर्षात कोणते कोर्स सुरू करणार आहेत ?	१. Certificate Course in Agri-tech and Digital Farming २.Certificate Course in Dairy Farming
६	**विदेशी भाषा प्रशिक्षण**	
	१) महाविद्यालयात विदेशी भाषा प्रशिक्षण सुरू आहे का ?	नाही

अ.क्र.	तपशील	स्थिती
	२) विदेशी भाषा प्रशिक्षणासाठी कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत ?	-
	३) असल्यास, कोणती भाषा शिकवली जाते ?	-
	४) नसल्यास, पुढील शैक्षणिक वर्षात कोणती विदेशी भाषा प्रशिक्षण सुरू करणार आहेत ?	जपानी, जर्मन
७	**कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रशिक्षण**	
	१) महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रशिक्षण सुरू आहे का ?	आहे
	२) असल्यास, किती विद्यार्थी प्रविष्ट आहेत ?	28
	३) त्यासाठी आवश्यक संगणक कक्ष पुरेसे आहेत का ?	नाही
	४) नसल्यास, संगणक कक्ष उपलब्ध करण्यासाठी अंदाजे किती खर्च येईल ?	3400000.00
८	**सामंजस्य करार**	
	१) महाविद्यालयाने कोणत्या संस्थांबरोबर सामंजस्य करार केले आहेत ?	१.महाराष्ट्र साहित्य परिषद, कोपरगाव (संशोधन) सूर्यतेज संस्था, कोपरगाव (इतर) राष्ट्रभाषा मंच, कोपरगाव, (इतर) एस २४ न्यूज',कोपरगाव (औद्योगिक) इंग्लिश अँड यु, पुणतांबा (शैक्षणिक) भूगोल विभाग (संशोधन केंद्र), के.जे. सोमय्या कॉलेज कोपरगाव (संशोधन) बँक ऑफ महाराष्ट्र, कोपरगाव (औद्योगिक) वेअर हौसिंग सोसायटी, कोपरगाव (औद्योगिक) वसुंधरा भाषा मोडीलिपी संवर्धन आणि संशोधन केंद्र, पुणे (संशोधन) इतिहास विभाग सौ.सुशीलामाई काळे महाविद्यालय, कोळपेवाडी. (शैक्षणिक) राज्यशास्त्र विभाग (संशोधन केंद्र), के.जे. सोमय्या कॉलेज कोपरगाव (शैक्षणिक) आस्था मानसिक समुपदेशन केंद्र, कोपरगाव (इतर)
	२) कार्यरत सामंजस्य करार किती आहेत ?	12.00
	३) त्याचा स्तर कोणता आहे ?	राज्यस्तरीय
	४) पुढील वर्षात कोणते सामंजस्य करार केले जाणार आहेत ?	१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे २. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा ३. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, सातारा ४. सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा ५. श्री संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा
९	**उद्योजकता विकास केंद्र**	
	१) महाविद्यालयात उद्योजकता विकास केंद्र सुरू आहे का ?	आहे

अ.क्र.	तपशील	स्थिती
	२) असल्यास, याअंतर्गत कोणते उपक्रम राबविले जातात ?	1.उद्योजकता विकास कार्यक्रम घेतले जातात. २. यशस्वी उद्योजकांची व्याख्याने आयोजित केली जातात. ३. विद्यार्थ्यांना व्यवसायाचा प्रत्यक्ष अनुभव यावा म्हणून My Idea to My Business हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविला जातो. ४. औद्योगिक भेटींचे आयोजन केले जाते.
	३) या केंद्रातील किती विद्यार्थ्यांनी स्वत:चे उद्योग सुरू केले ?	25
	४) भविष्यात कोणते उपक्रम राबविले जाणार आहेत ?	१. स्थानिक प्रसिध्द उद्योजकांच्या व्यवसायाच्या ठिकाणी भेटी देणार आहोत. २. औद्योगिक- शैक्षणिक संस्था सभेचे आयोजन करणार आहोत.
	५) नसल्यास, उद्योजकता विकास केंद्र पुढील शैक्षणिक वर्षात स्थापन करण्याबाबत व संदर्भित उपक्रम सुरू करण्याबाबतची माहिती द्यावी.	
१०	**करिअर कौंसेलिंग व प्लेसमेंट सेल**	
	१) महाविद्यालयात करिअर कौंसेलिंग व प्लेसमेंट सेलची स्थापना केली आहे का ?	होय
	२) असल्यास, करिअर कौंसेलिंग व प्लेसमेंट सेलसाठी स्वतंत्र समन्वयक / प्लेसमेंट ऑफिसरची नेमणूक केली आहे काय ?	नाही
	३) नसल्यास, याबाबतची पुढील शैक्षणिक वर्षामध्ये करण्यात येणारी कार्यवाही नमूद करावी.	
	४) असल्यास, यावर्षी किती विद्यार्थ्यांची प्लेसमेंट झाली आहे ?	206
	५) करिअर कौंसेलिंग व प्लेसमेंट सेल स्थापना केला नसल्यास, पुढील शैक्षणिक वर्षामध्ये करण्यात येणारी कार्यवाही नमूद करावी.	
११	**सेंटर ऑफ एक्सलन्स**	
	१) महाविद्यालयात सेंटर ऑफ एक्सलन्स केंद्र सुरू आहे का ?	नाही
	२) असल्यास, याअंतर्गत कोणते उपक्रम राबविले जातात ?	-
	३) या अंतर्गत भविष्यात कोणते उपक्रम राबविले जाणार आहेत ?	-
	४) सेंटर ऑफ एक्सलन्स नसल्यास, पुढील शैक्षणिक वर्षामध्ये करण्यात येणारी कार्यवाही नमूद करावी.	पुढील शैक्षणिक वर्षामध्ये Centre of Excellence in Professional Skills & Employability Enhancement सुरु केले जाणार असून त्याअंतर्गत बाह्य संस्थांशी सामंजस्य करार करून विविध स्किल कोर्सेस सुरु केले जाणार आहेत.
१२	**रयत स्पर्धा परीक्षा अॅकॅडमी**	

अ.क्र.	तपशील	स्थिती
	१) रयत शिक्षण संस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार महाविद्यालयात 'रयत स्पर्धा परीक्षा अॅकॅडमी' स्थापन करून कार्यान्वित केली आहे काय ?	होय
	२) असल्यास, 'रयत स्पर्धा परीक्षा अॅकॅडमी'मार्फत कोणत्या प्रकारच्या स्पर्धा परीक्षांना मार्गदर्शन केले जाते ?	१. UPSC २. MPSC ३. IBPS व इतर केंद्र शासनच्या परीक्षा ४. पोलीस व आर्मी भरती पूर्वप्रशिक्षण
	३) असल्यास, किती विद्यार्थी प्रविष्ट आहेत ?	20
	४) रयत स्पर्धा परीक्षा अॅकॅडमी स्थापना केली नसल्यास, अॅकॅडमी स्थापन करून कार्यान्वित करण्याबाबतची कार्यवाही नमूद करावी.	
	५) महाविद्यालयात भरतीपूर्व पोलिस प्रशिक्षण केंद्र तसेच रयत डिफेन्स अॅकॅडमी सुरू करण्यात आली आहे काय ?	होय
	६) असल्यास, प्रविष्ट विद्यार्थी संख्या नमूद करावी.	2
	७) नसल्यास, याबाबतचे नियोजन नमूद करावे.	
१३	**शाखेची प्रतिमा वाढवण्यासाठी विशेष उपक्रम**	
	१) महाविद्यालयात कोणते विशेष उपक्रम सुरू आहेत ?	१. शिक्षक आपल्या दारी २. ग्राम सर्वेक्षण व सामाजिक सहभाग ३. महिला सक्षमीकरण कार्यक्रम ४. जलसंधारण व रेन वॉटर हार्वेस्टींग ५. मतदार जनजागृती ६. कायदेविषयक जनजागृती ७. लोककला व भित्तीपत्रे ८. गोदावरी नदी स्वच्छता अभियान ९. कचरा व्यवस्थापन व बायोगॅस प्रकल्प १०. एस.एस.जी.एम.एक्स्पो ११. विविध स्कील व शॉर्ट टर्म कोर्सेस १२. रंग-तरंग स्पर्धा १३. ऐतिहासिक नाणी प्रदर्शन
	२) भविष्यात महाविद्यालयात कोणते विशेष उपक्रम सुरू करणार आहात ?	१. AI व आधुनिक शेती मार्गदर्शन कार्यशाळा
१४	**विभाग १ : शैक्षणिक धोरण आणि नवीन परीक्षा पद्धती**	
१	**NEP 2020 अंतर्गत बहुविषयकता**	
	१) आपल्या महाविद्यालयात NEP 2020 अंतर्गत कला शाखेसोबत संगणक, मीडिया आणि उद्योगकता यांसारख्या इतर शाखांमधील विषय शिकवण्याचा उपक्रम सध्या राबविण्यात येत आहे का ?	होय
	२) असल्यास त्याचे स्वरूप काय आहे ?	राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार कला शाखेतील विद्यार्थ्यांसाठी वाणिज्य विद्याशाखा व विज्ञान विद्याशाखेतील विविध कोर्सेस दिलेले आहेत.

अ.क्र.	तपशील	स्थिती
	३) नसल्यास भविष्यात बहुविषयक अभ्यासक्रम सुरू करण्याचे काय नियोजन आहे ?	
२	**अभिनव मूल्यमापन व Open Book Test**	
	१) विद्यार्थ्यांमध्ये विश्लेषणात्मक विचार वाढवण्यासाठी 'Open Book Test' किंवा केस स्टडीवर आधारित अभिनव मूल्यमापन पद्धती आपल्याकडे सुरू आहे का ?	नाही
	२) सुरू असल्यास तिची कार्यपद्धती काय आहे ?	-
	३) सुरू नसेल तर आगामी शैक्षणिक वर्षात ती लागू करण्याचे काय नियोजन आहे ?	सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन करताना विद्यार्थ्यांमध्ये विश्लेषणात्मक विचार वाढवण्यासाठी Open Book Test व केस स्टडीवर आधारित मूल्यमापन पद्धतीचा वापर पुढील वर्षापासून सुरू करणार आहोत.
३	**विद्यार्थी गुणवत्ता निर्देशांक (SQI)**	
	१) केवळ परीक्षेतील गुणांऐवजी उपस्थिती, वाचन आणि सामाजिक व्यवहार आधारित 'विद्यार्थी गुणवत्ता निर्देशांक' याद्वारे विद्यार्थ्यांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन केले जाते का ?	होय
	२) असल्यास याचे निकष काय आहेत ?	वार्षिक पारितोषिक वितरण समारंभामध्ये आदर्श विद्यार्थी व आदर्श विद्यार्थिनी असा पुरस्कार देण्यासाठी सहभागी विद्यार्थ्यांचे विविध घटकांच्या आधारे मूल्यमापन केले जाते. अशा घटकांमध्ये त्या विद्यार्थ्यांचे मागील परीक्षेचे गुण, वर्गातील नियमित उपस्थिती, ग्रंथालयामधील सहभाग, महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांमधील सहभाग, क्रीडा क्षेत्रातील सहभाग, NSS व NCC विभागातील सहभाग, कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेतील सक्रीय सहभाग, संशोधन कार्य व वैयक्तिक वर्तन यांचा समावेश केला आहे.
	३) नसल्यास असा इंडेक्स तयार करण्याचे भविष्यात काय नियोजन आहे ?	
४	**कला एकात्मिक शिक्षण (Art Integrated Learning)**	
	१) नाटक, लोककला आणि चित्रकला यांसारख्या कलांच्या माध्यमातून अभ्यासक्रमातील विषय शिकवण्याचा उपक्रम सध्या राबवला जात आहे का ?	नाही
	२) असल्यास त्याचे स्वरूप कसे आहे ?	-

अ.क्र.	तपशील	स्थिती
	३) उपक्रम सुरू नसेल तर भविष्यात प्राध्यापकांना यासाठी कसे प्रोत्साहित केले जाईल ?	कला शाखेतील सर्व प्राध्यापकांना कला संचलित अध्यापन पद्धतीचे प्रशिक्षण दिले जाईल व कला संचलित अध्यापन हे विविध विषय शिकविताना कसे वापरावे याविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे.
५	**फिल्ड वर्क डायरी**	
	१) प्रत्येक सत्रात विद्यार्थ्यांनी सामाजिक किंवा औद्योगिक संस्थेला भेट देऊन फिल्ड वर्क डायरीमध्ये अनुभव लेखन करणे अनिवार्य केले आहे का ?	होय
	२) असल्यास त्याचे स्वरूप काय आहे ?	राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व विद्यार्थ्यांना फिल्ड प्रोजेक्ट व कम्युनिटी एंगेजमेंट प्रोग्राम (CEP) हा अनिवार्य असून त्याच्या अहवालामध्ये अनुभव लेखन करणे अनिवार्य केले आहे.
	३) नसल्यास आगामी सत्रापासून ते लागू करण्याचे काय नियोजन आहे ?	
१५	**विभाग २ : संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर**	
१	**Artificial Intelligence आणि मानवविज्ञानशाखा उपक्रमी**	
	१) मानवविज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना ChatGPT आणि आधुनिक AI साधनांच्या वापराबाबत प्रशिक्षण देणारा उपक्रम सध्या महाविद्यालयात कार्यरत आहे का ?	होय
	२) असल्यास त्याचे स्वरूप काय आहे ?	महाविद्यालयामध्ये Certificate Course in Artificial Intelligence हा सुरू आहे .
	३) सुरू नसेल तर भविष्यात असा उपक्रम सुरू करण्याचे काय नियोजन आहे ?	
२	**डेटा व्हिज्युअलायझेशन**	
	१) माहिती आणि आकडेवारीला आलेख किंवा नकाशांच्यास्वरूपाततांत्रिकदृष्ट्यामांडण्याचे (Data Visualization) कौशल्य विद्यार्थ्यांना शिकवले जात आहे का ?	होय
	२) असल्यास त्याचे स्वरूप काय आहे ?	महाविद्यालयातील भूगोल व इतर विभागामध्ये आलेख, नकाशे, GIS Software, Digital Cartography उपलब्ध असून त्या मार्फत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. GIS, ERDAS Imagine, Flourish, Looker Studio, etc
	३) नसल्यास यासाठी विशेष कार्यशाळा घेण्याचे काय नियोजन आहे ?	
३	**विद्यार्थी संशोधन मंच (Student Research Forum)**	

अ.क्र.	तपशील	स्थिती
	१) महाविद्यालयात विद्यार्थी संशोधन मंचाची स्थापना करून संशोधन पद्धतीचे प्रशिक्षण आणि संशोधन जर्नल प्रकाशित करण्याचा उपक्रम सुरू आहे का ?	होय
	२) असल्यास त्याचे स्वरूप कसे आहे ?	महाविद्यालयातील संशोधन समितीमध्ये पदव्युत्तर विभागातील विद्याशाखानिहाय प्रत्येकी एका विद्यार्थ्यांची नेमणूक केलेली असून या समितीमार्फत विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रेरित केले जाते. आविष्कार संशोधन स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. तसेच, विविध संशोधन जर्नल मध्ये संशोधन लेख प्रसिद्ध करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.
	३) सुरू नसेल तर भविष्यात तो राबविण्याचे काय नियोजन आहे ?	
४	**डिजिटल कंटेंट निर्मिती प्रशिक्षण**	
	१) महाविद्यालयात पॉडकास्ट, ब्लॉग लेखन आणि यूटचूब शैक्षणिक व्हिडिओ निर्मितीद्वारे विद्यार्थ्यांचे डिजिटल संवाद कौशल्य विकसित करण्याचे प्रशिक्षण दिले जाते का ?	नाही
	२) असल्यास त्याचे स्वरूप काय आहे ?	-
	३) सुरू नसेल तर भविष्यात अशा प्रकारची लॅब स्थापन करण्याचे काय नियोजन आहे ?	महाविद्यालयामध्ये डिजिटल कंटेंट निर्मितीसाठी कला शाखेतील विद्यार्थ्यांसाठी एक नवीन कोर्स च्या माध्यमातुन रील्स, स्पर्धा, कंटेंट रणनीति, रचनात्मक लेखन, विजुअल व ग्राफिक डिजाइन (Canva), वीडियो संपादन ई. उपक्रम सुरु करण्याचे नियोजन केले आहे व त्यासाठी स्वतंत्र लॅब उभारली जाणार आहे.
५	**पॉडकास्ट सिरीज "संवाद"**	
	१) अभ्यासक्रमातील विषयांवर तज्ज्ञांच्या चर्चेच्या ध्वनिफिती तयार करणारी 'संवाद' पॉडकास्ट सिरीज महाविद्यालयात सुरू आहे का ?	नाही
	२) असल्यास त्याचे स्वरूप काय आहे ?	-
	३) असा उपक्रम सुरू नसेल तर भविष्यात तो राबविण्याचे काय नियोजन आहे ?	कला विद्याशाखेतील अभ्यासक्रमातील विषयांवर आधारित विविध तज्ज्ञांच्या चर्चेच्या ध्वनिफिती व चित्रफिती तयार करण्यासाठी संवाद पॉडकास्ट सिरीज महाविद्यालयामध्ये सुरू केली जाणार असून त्यासाठी संबंधित सर्व प्राध्यापकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.
६	**ऐतिहासिक सहली**	
	१) तंत्रज्ञानाच्या (Virtual Reality) मदतीने विद्यार्थ्यांना ऐतिहासिक स्थळांचा आभासी अनुभव देणारा उपक्रम राबविला जात आहे का ?	होय

अ.क्र.	तपशील	स्थिती
	२) असल्यास त्याचे स्वरूप काय आहे ?	तंत्रज्ञानाच्या मदतीने विद्यार्थ्यांना विविध ऐतिहासिक स्थळांचा आभासी अनुभव देणारे अनेक व्हिडिओ महाविद्यालयांमध्ये उपलब्ध असून त्या व्हिडिओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.
	३) उपक्रम सुरू नसेल तर भविष्यात हे तंत्रज्ञान आणण्याचे काय नियोजन आहे ?	-
७	**सायबर सुरक्षा साक्षरता**	
